# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 22.08.2024** **वार – गुरुवार**

---

**धंगेकर**

महाराष्ट्र राजपत्रित अधिकारी संयुक्त पूर्व परीक्षा पुढे ढकलण्यात आल्याची घोषणा महाराष्ट्र लोकसेवा आयोगानं केली आहे. बँक कर्मचारी निवड संस्थेची लिपिक भरती परीक्षा आणि एमपीएससीची परीक्षा 25 ऑगस्टला एकाच दिवशी आल्या होत्या; त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांची अडचण लक्षात घेऊन याबाबत तोडगा काढवा अशी मागणी करत, स्पर्धा परीक्षा देणारे विद्यार्थी दोन दिवसांपासून पुण्यात आंदोलंन करत होते.

**विद्यापीठ**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्यावतीनं घेण्यात येणारी पीएच.डी. प्रवेश परीक्षा अर्थात PET पुढे ढकलण्यात आली आहे. ही परीक्षा येत्या शनिवारी 24 ऑगस्ट रोजी घेतली जाणार होती; मात्र ती आता 31 ऑगस्ट रोजी घेतली जाईल असं शैक्षणिक प्रवेश विभागाचे उपकुलसचिव डॉक्टर मुंजाजी रासवे यांनी कळवलं आहे.

**नारद पुरस्कार**

आपण आपल्या अनुभवांच्या आधारे विविध जीवनमूल्यांची व्याख्या केली आहे; पण आधुनिक राष्ट्र म्हणून पुढे जाताना अशा संकल्पनांचं पुनर्मूल्यांकन होणं गरजेचं आहे, असं मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी आज पुण्यात व्यक्त केलं. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या काळात मानवी प्रज्ञेची देखील आवश्यकता आहे असं ते म्हणाले. विश्व संवाद केंद्र आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या वतीनं दिले जाणारे देवर्षी नारद माध्यम पुरस्कार आज आंबेकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले; यावेळी 'सांस्कृतिक राष्ट्रवाद आणि प्रसारमाध्यमं' या विषयावर ते बोलत होते. या कार्यक्रमात ज्येष्ठ पत्रकार-संपादक सम्राट फडणीस, वार्ताहर प्रसाद पानसे आणि कोल्हापूरच्या खासगी रेडियोच्या कार्यकारी निर्मात्या रसिका कुलकर्णी, आणि समाजमाध्यम क्षेत्रात काम करणारे सूरज खटावकर आणि प्रशांत दांडेकर यांना देवर्षी नारद माध्यम पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं.

**<u>शिरोळे</u>**

पुणे शहराचा सांस्कृतिक चेहरा असलेल्या बालगंधर्व रंगमंदिरात कलाकारांची आणि रसिक प्रेक्षकांची कोणतीही गैरसोय होता कामा नये, अशा स्पष्ट सूचना आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी महापालिकेच्या अधिकाऱ्यांना दिल्या. शिरोळे यांनी आज बालगंधर्व रंगमंदिराला भेट दिली. यावेळी अभिनेते आणि अखिल भारतीय नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले, महानगरपालिकेच्या सांस्कृतिक विभागाचे उपायुक्त सुनील बल्लाळ उपस्थित होते.

**<u>पुणेमनपा</u>**

गणेशोत्सव काळात सार्वजनिक गणेश मंडळांना मंडप, स्वागत कमानी उभारण्यासाठी पुणे महापालिकेनं 2019 मध्येच परवानगी दिली आहे. ही परवानगी पाच वर्षांच्या कालावधीसाठी ग्राह्य धरली जाणार आहे. मात्र, ज्या गणेशमंडळांना यावर्षी परवानगी घ्यायची आहे; त्यांच्यासाठी संबंधित पोलिस स्थानकामध्ये एक खिडकी योजना राबवण्यात येणार असल्याचं पुणे महापालिकेनं कळवलं आहे.

**<u>कॉफी विथ कमिशनर</u>**

नवी दिशा उपक्रमातील महिला बचत गटांचा प्रशासनातील सहभाग वाढवण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेनं 'कॉफी विथ कमिशनर' हा उपक्रम सुरु केला आहे. या उपक्रमाअंतर्गत झालेल्या पहिल्या बैठकीत बचत गटातील महिलांना आयुक्त शेखर सिंह यांच्याशी थेट संवाद साधण्याची संधी मिळाली. यावेळी त्यांनी नवी दिशा उपक्रमाच्या भविष्यातील संधी, आव्हानं आणि अनुभवांबद्दल सिंह यांच्याशी सविस्तर चर्चा केली.

**<u>लाडके डोंगर</u>**

पुण्यातील विविध टेकड्या वाचवण्यासाठी लाडके डोंगर सारखी योजना राज्य शासनानं सुरू करावी आणि या टेकड्यांचं जतन-संवर्धन करावं अशी मागणी पुण्यातील पर्यावरणप्रेमी संघटनांनी केली आहे. शहरातील अनेक टेकड्यांवर सध्या बेकायदा सपाटीकरणाचं काम सुरू  असल्याचा आरोपही या संघटनांनी केला आहे.

**<u>निधन</u>**

कवयित्री पद्मिनी बिनिवाले यांचं काल पुण्यात वृद्धापकाळानं निधन झालं. दादरच्या शारदाश्रम शाळेत त्या शिक्षिका होत्या.

**क्रीडा**

पुण्यात 14 वर्षांखालील गटाच्या जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धा नुकत्याच पार पडल्या. यात कृष्णसाई वंदनाप्पु प्रथम, आयन सोमाणी द्वितीय तर संभव भटेवरा यानं तृतीय क्रमांक पटकावला. स्पर्धेत एक हजार 849 स्पर्धक सहभागी झाले होते.

**पाऊस**

सुमारे 10 दिवसांच्या विश्रांतीनंतर पुण्यात पाऊस पुन्हा एकदा सक्रीय झाला असून आगामी 3 ते 4 दिवसांत पावसाचा जोर आणखी वाढण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. ऑगस्टमध्ये पुण्यात सरासरी 145 मिलीमीटर पाऊस होतो; मात्र यंदा आत्तापर्यंत 185 मिलीमीटर पाऊस झाला आहे. दरम्यान मुसळधार पावसामुळे पुणे जिल्हयातील सुमारे एक हजार 74 हेक्टरवरील पिकं आणि फळबागांचं नुकसान झालं असल्याची माहिती जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे यांनी दिली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**